तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2a@dte.org.in Internet : http\\:www.dtemaharashtra.gov.in

क्र.2अ/एडीएम/ARC/FC/2016/ 9845
दिनांक : - 8 NOV 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता संबंधित संस्था यांना विद्यार्थ्यांकडून प्राप्त सीट ॲक्सेपटन्स फी तसेच सुविधा केंद्र (Facilitation Centre) व प्रवेश निश्चिती केंद्र (Admission Reporting Centre) यांना मानधन अदा करण्याकरिता बँक तपशील अद्ययावत करणेबाबत

शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता सर्व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश अलॉट झालेल्या उमेदवारांकडून (रु.1000/-) एस.सी. व एस.टी. प्रवर्गातील उमेदवारांकडून व (रु.5000/-) उर्वरित उमेदवारांकडून सीट ॲक्सेपट्स शुल्क घेण्यात आले आहे. सदर शुल्क संस्थेच्या शिक्षण शुल्काचा भाग (Part Payment) म्हणून घेण्यात आले असून अलॉट झालेल्या संस्थेमध्ये प्रवेश निश्चित केलेल्या उमेदवारांचे रु.1000/- Processing शुल्क वजा करुन उर्वरित शुल्क संबंधित संस्थाना अदा करण्यात येणार आहे.

तसेच सदर प्रवेश प्रक्रियेकरिता सुविधा केंद्र (Facilitation Centre) व प्रवेश निश्चिती केंद्र (Admission Reporting Centre) निश्चित करण्यात आलेली होती. प्राधिकरणाच्या दिनांक 06.05.2016 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर केंद्राना प्रति उमेदवार (Candidate) रु.100/- मानधन मंजूर करण्यात आलेले आहे.

संबंधित संस्थाना प्रवेशित विद्यार्थ्यांचे सीट ॲक्सेपट्नस शुल्क अदा करण्याकरिता तसेच FC व ARC यांना देय मानधनाची रक्कम अदा करण्याकरिता त्यांचे अद्ययावत Bank Details प्राधिकरणास सादर करावयाचे आहेत. याकरिता अभ्यासक्रमनिहाय संस्था, FC व ARC यांचे Bank Details बाबतची Excel File आपणास पाठविण्यात येत आहे. आपल्या विभागातील केंद्राचा तपशील तपासून खाली दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. काही संस्था तसेच FC व ARC यांनी **"Beneficiary Name", "Beneficiary Account No", "Beneficiary IFSC Code"** इत्यादी बाबत त्यांच्या Login मध्ये चुकीचे Crdentials नमूद केल्याचे आढळून आले आहे.
2. वरील बाब विचारात घेता शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांना पाठविण्यात आलेल्या Excel File मधील त्यांच्या अधिपत्याखालील संस्था, FC व ARC केंद्र यांच्याशी संपर्क साधून त्यांचे Bank Details अद्ययावत करावेत. तपशील तपासून "Remark by RO" या रकान्यामध्ये आपले अभिप्राय द्यावेत.
3. वरील कार्यवाही सदर पत्र निर्गमित झाल्यापासून एक आठवडयापर्यंत पूर्ण करावी.
4. अशा प्रकारे तपासून प्राप्त झालेला तपशील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करण्यात येईल.
5. Excel File सर्व विभागीय कार्यालयांसोबत Share करण्यात येत आहे. विभागीय कार्यालयांनी त्यामध्ये केंद्राचा तपशील अद्ययावत करावा.

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन अद्ययावत तपशील संचालनालयास सादर करावा. चुकीच्या बँक खात्यामध्ये केंद्राचे मानधन जमा झाल्यास याची पूर्ण जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहील.

शैक्षणिक वर्ष 2015-16 करिता 'जोडपत्र अ' मध्ये आवश्यक तपशील सादर न केल्यामुळे काही केंद्राना मानधन अद्याप अदा करण्यात आलेले नाही. अशा केंद्राना संचालनालयाच्या लेखाशाखेकडे 'जोडपत्र अ' मध्ये बँकेचा तपशील सादर करण्यास कळविण्यात यावे. (सोबत प्रत)

(सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/मानधन/२०१६/3536
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 24 NOV 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व सुविधा केन्द्र व प्रवेश निश्चिती केन्द्र, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करुन बँकेचा तपशिल जोडपत्र-अ मध्ये भरुन मुळ प्रत या कार्यालयास दिनांक २५/११/२०१६ पर्यंत सादर करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

शासन निर्णय क्र. संकीर्ण - १०१० / प्र. क्र. ६८ / कोषा प्र - ५, दि. १८ एप्रिल, २०११ चे सहपत्र.

## जोडपत्र - अ

## ई सी एस / एन ई एफ टी द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१ मागणीदार /पुरवठादार /कंत्राटदारचे
नाव / फर्मचे नाव

२ कार्यालयाचे नाव व पत्ता (ज्या प्रकरणी
लागू आहे)

३ बँक खाते क्रमांक

४ बँक खात्याचा प्रकार

५ बँकेचे नाव

६ बँक शाखेचे नाव व पत्ता

७ बँक शाखेचा संकेतांक

८ एम आय सी आर क्रमांक

९ आय एफ एस सी संकेतांक

कंत्राटदार / पुरवठादार / मागणीदाराची सही

दिनांक

## बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहीली असून ती योग्य आहे.

शाखा प्रमुख

------------------- (बँक शाखेचे नाव व शिक्का)